
PHOENIX
WE SHALL RISE
Larc
Happines First, Else Follows
हसत सुख सदा सुख
Madhavi Ogale
Vocational
School
उद्योगातून यशाकडे
Affluence through
Enterprise
'आस ज्ञानसूर्याची'
Bennu
Training Institute
SRUJANARANG
Prism Foundation
We Shall Overcome

ISO 9001 - 2008 CERTIFIED

QUALITY
ASSURED
COMPANY
ISO 9001 : 2008

ISC
INTERNATIONAL STANDARDS
CERTIFICATIONS



# Prism Foundation

## We Shall Overcome



**Prism Foundation**

We Shall Overcome

## PRISM FOUNDATION

Prism Foundation was launched in 1990 by Mrs. Padmaja Godbole. With a burning desire to broaden the horizons of children with special needs, Mrs. Godbole lovingly planted this sapling with the assistance of Mr. Y. G. Patwardhan and Late Mrs. Madhavi Ogale. Over the years, the Prism Family has nurtured it into a strong, shady banyan tree with five flourishing branches - Phoenix, LARC, MOVS, Bennu and Srujanrang - each with a specific purpose.

Phoenix School was started for the benefit of children with learning difficluties, LARC for those with multiple disabilities, MOVS to impart vocational training, Bennu for training teachers and increasing public awareness and Srujanrang for creative expression through various art forms.

Prism Foundation endeavours to provide the support and guidance necessary to help children with difficulties grow into well rounded individuals and more importantly, responsible members of society. The children are provided with a plethora of opportunities that encourage them to realize their potential optimally. Our goal is to create an environment that is conducive to every child's healthy, holistic development. This process is enabled by the collaboration between teachers and parents who share a thriving, mutually enriching and long lasting relationship.





**Prism Foundation**

We Shall Overcome

# प्रिझम फौंडेशन

''विशेष गरजा असलेल्या मुलांमधील सुप्त गुणांचे क्षितिज विस्तारले जावे'' या पद्मजा गोडबोले यांच्या तीव्र इच्छेमधून १९९० साली प्रिझम फौंडेशनचे बीज निर्माण झाले. या बिजाला खतपाणी घालण्याचे महत्वाचे काम कै. माधवी ओगले व श्री. यशवंतराव पटवर्धन यांनी केले. प्रिझम फौंडेशनच्या सर्व कुटुंबियांनी या छोट्याशा रोपट्याची प्रेमाने, आपुलकीने मशागत केली आता त्याचा मायेची छत्रछाया धरणारा वटवृक्ष झाला आहे.

आपल्या पाच वेगवेगळ्या शाखांच्या माध्यमातून प्रिझम वृक्ष जोमाने बहरतो आहे. अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांसाठी 'फिनिक्स', संमिश्र अपंगत्वाच्या मुलांसाठी 'लार्क', पूर्व व्यावसायिक शिक्षणासाठी 'माधवी ओगले व्यावसायिक शाळा', जनजागृती व शिक्षक प्रशिक्षणासाठी 'बेन्यू प्रशिक्षण संस्था' तर नवनिर्मितीसाठी कलांचा उपयोग करणारे 'सृजनरंग कला अभिव्यक्ती केंद्र' या पाचही शाखांच्याद्वारे विशेष मुलांसाठी प्रिझम फौंडेशन कार्यरत आहे. या प्रत्येक शाखेचे स्वतःचे असे वेगळे ध्येय आहे, उद्दिष्ट आहे व त्या दिशेने शाखाविस्तार होत आहे. इथे प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या सुप्त गुणांची उच्चतम पातळी गाठता यावी यासाठी जास्तीत- जास्त संधी उपलब्ध करुन दिली जाते व त्याच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य, निकोप वातावरण निर्माण केले जाते.

सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच अध्ययन अक्षम व संमिश्र अपंगत्व असणाऱ्या मुलांना सर्वार्थाने सक्षम बनवणे, त्यांच्यामध्ये मूल्ये रुजविणे व सर्वांगाने संपन्न, सुजाण व्यक्ती घडविणे, यासाठी मार्गदर्शनाबरोबरच लागेल ती मदत करणे हे प्रिझम फौंडेशनचे ध्येय आहे.

सुजाण नागरीक म्हणून जगतांना भोवतालच्या वास्तवाचा आत्मविश्वासाने सामना करता यावा, परिस्थितीला सामोरे जातांना संयम ठेवता यावा, हे विद्यार्थ्यांना शिकवितांना प्रिझम फौंडेशनचे शिक्षक व मुलांचे पालक यांचे एकमेकांशी आपुलकीचे नाते निर्माण होते हे एक मोठे यशच मानावे लागेल.



Prism Foundation

We Shall Overcome

## PHOENIX SCHOOL

Phoenix School has a team of 20 trained and dedicated teachers who work with those children who are not able to fit into the conventional system. Each child in this group of 130 is viewed as a unique individual with his or her own set of special abilities. The focus is on the child's strengths rather than his weaknesses; on what he is able to do rather than what he cannot.

The children are taught in a scientific, methodical way. The features of this teaching methodology are as follows:

1) An individual educational plan or IEP is prepared for every child. The level of the syllabus planned for a child may vary from subject to subject in synch with the child's ability in each subject.

2) Group teaching, peer tutoring, remedial teaching, co-teaching are some of the techniques used to teach the children.

3) Innovative teaching methods are used along with the use of aids like audio visual media, field visits, projects, practical experiences, worksheets and individual cards to supplement the lesson.

4) Activities based on the theory and application of multiple intelligences are planned. A simple activity like cooking appeals to a number of intelligences. It involves reading, measuring ingredients, mixing and cooking. This is followed by laying the table and serving others.



5) Sports are a crucial part of the curriculum. Physical movements help to energize the body, stimulate the brain and improve gross motor co-ordination and body balance.

6) Dance, drama, music -vocal and instrumental, art and craft help to improve fine motors skills, eye-hand co-ordination and self expression. Similarly these activities also reduce aggression and stimulate creativity.

7) Functional academics is taken for children who cannot cope with mainstream academics, in a separate group-the pre-vocational group. Preliminary knowledge of health and nutrition, child care, home management and social etiquette is given through experiences along with practical work such as canning, baking, stitching, candle making, jewellery making etc.

8) Computer training is imparted to senior students as part of the Board curriculum.

9) Children appear for the Xth standard S.S.C. Board Examination and the NIOS Exam-National Institute of Open Schooling (CBSE-Board) along with children from main stream schools.

10) Children participate in public examinations conducted by Tilak Maharashtra Vidyapeeth, Hindi Rashtrabhasha, Akhil Bharatiya Gandharva Maha Vidyalaya (Music) and various competitions in art and elocution along with children from mainstream schools.

The primary objective of Phoenix is to ensure that the child, apart from gaining academic proficiency, is equipped with adequate self- confidence and social skills in order to be absorbed smoothly into the mainstream for his further education.





PHOENIX
WE SHALL RISE

## फिनिक्स शाळा

पारंपरिक पद्धतीने चालविण्यात येणाऱ्या शिक्षण संस्थांमधील अध्ययन-अध्यापन पद्धतीत न सामावणाऱ्या विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी, त्यांना शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित, उत्साही अशा वीस शिक्षकांचा गट फिनिक्समध्ये कार्यरत आहे. सुमारे एकशेतीस विद्यार्थ्यांमधील प्रत्येक विद्यार्थ्याचा, त्यांच्यातील क्षमतांचा अभ्यास करून, त्यांच्या दुर्बलस्थानांपेक्षा बलस्थानांवर लक्ष केंद्रित करून ते मूल कशी प्रगती करेल यांकडे प्रत्येकाचे लक्ष असते.

शास्त्रीयदृष्ट्या विकसित झालेल्या पद्धतींचा वापर करून मुलांना शिकविताना पुढील गोष्टींवर भर दिला जातो.

१) प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक शैक्षणिक कार्यक्रम (IEP) राबवला जातो. प्रत्येक विषयांतील मुलाचा कल बघून; त्याच्या क्षमतांवर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येतो.

२) गट अध्यापन, समवयस्क अध्यापन, उपचारात्मक अध्यापन यासारख्या अध्ययन-अध्यापन पद्धती राबविल्या जातात.

३) दृक्श्राव्य माध्यम, क्षेत्रभेटी, प्रकल्प, प्रत्यक्षानुभव, वैयक्तिक कार्डस्, वर्कशिटस् यासारख्या माध्यमांचा वापर करून कल्पकतेने तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचा पूरक वापर पाठ शिकवताना केला जातो.

४) बहुविध बुद्धिमत्तांचा, उपक्रमांचा वापर करून लिखित भाग शिकविण्याचे नियोजन केले जाते. उदा. स्वयंपाकासारखे साधे उपक्रम विविध बुद्धिमत्तांना चालना देतात. यात वाचन, साहित्याचे मोजमाप, मिश्रण करणे व शिजविणे यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे टेबलावर पदार्थांची आकर्षक मांडणी करणे, वाढणे असेही उपक्रम असतात. भाषिक, गणिती, आकाशीय, स्नायूधिष्ठीत, आंतरव्यक्तिक, व्यक्तिअंतर्गत, अशा सर्व बुद्धिमत्तांचा यात विकास होतो. सांगितिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी, वातावरणनिर्मितीसाठी सौम्य, मंद संगीताची मदत होते.

५) खेळ हा देखील अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. मेंदूला उत्तेजना देणे, ढोबळकारक कौशल्य सुधारणे, शरीरसंतुलन साधणे हे हेतू त्यामुळे सिद्ध होतात.

६) नृत्य, नाट्य, संगीत, हस्तकला, चित्रकला यांच्या माध्यमातून सूक्ष्मकारक कौशल्य, हस्तनेत्र कौशल्य, शरीरसंतुलन वाढायला मदत होते.

७) ज्या मुलांना नेहमीचा अभ्यासक्रम झेपत नाही अशां विद्यार्थ्यांचा वेगळा गट करून (पूर्व व्यावसायिक गट) त्यांच्यासाठी व्यवहारोपयोगी अभ्यासक्रम राबवला जातो. ज्यांमध्ये प्रात्यक्षिकाच्या मदतीने आरोग्य व पोषक आहार, विद्यार्थ्यांची काळजी, घरातील व्यवस्थापन, सामाजिक चालीरिती यांचा समावेश होतो. कॅनिंग, बेकिंग, शिलाईकाम, दागिने बनविणे इत्यादी गोष्टी शिकविल्या जातात.

८) आधुनिक काळाशी मिळते-जुळते होण्यासाठी आवश्यक असलेले संगणक प्रशिक्षणही मोठ्या मुलांना देण्यात येते.

९) माध्यमिक शालान्त परीक्षा तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूल (NIOS) च्या परीक्षा इतर पारंपरिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने फिनिक्स विद्यार्थी देतात व यशस्वी होतात.

१०) त्याचप्रमाणे टि.म.वि., हिंदी राष्ट्रभाषा, गांधर्व महाविद्यालय (संगीत) अशा परीक्षांसाठी तसेच स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते.

या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रभुत्वाबरोबच आत्मविश्वास आणि सामाजिक कौशल्ये आत्मसात केली तर त्यांचे पुढील शिक्षण सुकर होईल असा फिनिक्सचा विश्वास आहे.

**Prism Foundation**

We Shall Overcome





## LARC (MULTIPLE DISABILITIES)

Children, who are mentally or physically challenged, suffer from epilepsy, Cerebral Palsy, Down's Syndrome, Muscular Dystrophy, Autism, speech, visual or hearing impairments form the group of beneficiaries in LARC. The teacher-student ratio is 1:10. Since each child carries a different cluster of challenges, constant and conscious effort is made by the teachers to see that each student receives individual attention and care with special emphasis on each child's strengths.

An individual education plan (IEP) is made for each child keeping the child's abilities and special interests in mind. The teachers prepare text books and teaching material themselves according to each child's level.

At LARC, the children are prepared to face the world by becoming self sufficient and independent. They learn simple life skills through planned learning experiences. Some children form an academic group which follows the curriculum laid down by the State Education Board upto the VIIth Grade. Some children get absorbed in Phoenix School after that and are prepared for the SSC or NIOS Board Examination.

The children visit the Bal Kalyan Sanstha once a week, to participate in various activities like swimming, tabla, volleyball, cricket etc. Students have participated and won medals at the national and international level.

Various activities like field trips, treks, dance, drama, recitation, art & craft instill confidence in the children, including those dependent on the wheelchair. Overnight trips are arranged to increase self reliance and social skills.

Children also learn basic skills in computers. Activities like yoga, mallkhamb help to develop muscular strength.

When the child is eighteen years old , he is absorbed into MOVS for vocational training.

Happines First, Else Follows
हसत मुख सदा सुख

## **लार्क** (संमिश्र अपंगत्व)

मानसिक अपंगत्वाबरोबर अपस्मार, मेंदूची बहुविकलांगता, डाऊन्स सिन्ड्रोम, वाचादोष, श्रवणदोष, दृष्टीदोष अशा प्रकारांपैकी एक वा अधिक शारीरिक अपंगत्वाचे आव्हान पेलणारी मुले 'लार्क'चा लाभ घेत आहेत.

प्रत्येक मूल आपल्या शिक्षकांपुढे विविध आव्हानांचा डोंगर उभा करत असते. या आव्हानांना जागरुकतेने तोंड देण्याचे प्रयत्न शिक्षक सातत्याने करत असतात. दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक काम करत असल्यामुळे प्रत्येकाला वैयक्तिक मार्गदर्शन करणे, प्रत्येकाच्या बलस्थानावर लक्ष केंद्रित करणे शक्य होते. काही वर्गात कमी विद्यार्थी असले तरी त्यांना लागणाऱ्या मदतीनुसार सहाय्यकही दिला जातो. त्यामुळे मुलांची व्यवस्थित काळजी घेता येते.

विविध चाचण्यांच्या आधारे मुलांचा वैयक्तिक कार्यक्रम तयार केला जातो. ज्यामध्ये स्वमदत कौशल्यांपासून भावनिक, सामाजिक, दळणवळण, जीवनव्यवहार उपयोगी कौशल्ये ठरविली जातात. अर्थातच मुलांची बलस्थाने, त्यांची आवडही लक्षात घेतली जाते व या दोन्ही गोष्टींचा वापर करून शिक्षिका मुलांसाठी अभ्यासक्रम ठरवितात,त्याचबरोबर त्यासाठी अत्यावश्यक असणारी पाठ्यपुस्तके, विविध शैक्षणिक साधने तयार करतात.

या मुलांना जगाला सामोरे जाण्यासाठी स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविणे ही शिक्षक वर्गाची खरी कसोटी असते. साधीसोपी जीवन-व्यवहारोपयोगी कौशल्ये विविध अनुभवांच्या सहाय्याने शिकविली जातात. सौम्य मतिमंदत्व असलेल्या मुलांपैकी काही विद्यार्थी इयत्ता पाचवी, सहावी, सातवी पर्यंतचा अभ्यासक्रमही शिकू शकतात व कालांतराने फिनिक्स शाळेमार्फत शालान्त परीक्षा अथवा NIOS च्या परिक्षाही देऊ शकतात, अर्थात अशी उदाहरणे तुलनेने कमी असली तरी 'ती आहेत हे' लक्षात ठेवायला हवे. मुलांमध्ये असलेली अशी चमक हेरायला लागणारी रत्नपारख्यांची दृष्टी शिक्षक वर्गाकडे आहे हे चित्र आशादायी वाटते.



अपंग बालकल्याण संस्थेमध्ये चालणाऱ्या पोहणे, तबला, व्हॉलीबॉल, क्रिकेट यांसारख्या खेळांमध्ये मुलांचा सहभाग असतो. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरच्या विविध स्पर्धांमध्ये मुले सहभागी होऊन बक्षिसेही मिळवतात व आपल्या क्रिडा नैपुण्याची झलक दाखवतात. गिर्यारोहणासारखा धाडसी खेळही मुलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपयोगी ठरतो.

क्षेत्रभेटी, नृत्य, नाट्य, पाठांतर कला, चित्रकला अशा उपक्रमांमध्ये व्हीलचेअर वापरणारी व इतर अशी सर्व मुले सहभागी होतात ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतोच, त्याचबरोबर सामाजिक कौशल्य आणि स्वावलंबन कौशल्य वाढते. मुलांना संगणक वापराबद्दलची मूलभूत कौशल्येही शिकविली जातात. योगासने, मल्लखांब यासारख्या उपक्रमांमुळे स्नायूंची ताकद वाढायला मदत होते.

१८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांचा समावेश माधवी ओगले व्यावसायिक शाळेत केला जातो.

लार्कमध्ये येणाऱ्या प्रत्येक मुलाचा क्षमताधिष्ठित विकास घडविणे, स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी आवश्यक कौशल्ये शिकविणे, मुलांना स्वत:च्या वेळेचा उपयोग करता येऊन समाजाचा एक घटक म्हणून सन्मानाने जगायला शिकविणे हे लार्कचे उद्दिष्ट आहे.



Prism Foundation

We Shall Overcome

## MADHVI OGALE VOCATIONAL SCHOOL

It is the belief of the foundation that with adequate efforts, appropriate guidance and ample opportunities, every individual can become a capable and productive human being and most importantly an asset to the society. MOVS focuses on helping the youth who are between the ages of 18 to 25 years. The centre runs various training programs such as screen printing, canning, file making, baking, making paper-bags out of old newspapers and several activities which help the youth in gaining different skills as well as confidence. The training courses include actual operation, production and sale of the products. Supplementary skills like costing, marketing and packing are also learnt by the students. MOVS students visit various institutions and organizations for the collection of supply orders and delivery of products. They participate in exhibitions and trade fairs.

Students who complete their training and satisfy the requirements of the school are assessed by the principal and are given placement in Madhavi Ogale Vocational School. They are allotted responsibilities according to the specific skill that they have acquired during training. They are sometimes appointed either in Larc or Phoenix School, depending upon their interest in administration or classroom situation, based on the teacher's observation and the principal's evaluation. Students are encouraged to participate in various competitions: particularly in the field of sports such as volleyball, trekking and swimming. They have won several awards in art and craft competitions. Training gives them confidence. MOVS alumni are successful, sensitive and responsible adults today. They work either as assistants or are self employed.

New activities such as "Mallkhamb" and gymnastics have been going on for selected groups from all the three schools.





**Madhavi Ogale Vocational School**

उद्योगातून यशाकडे





# माधवी ओगले व्यावसायिक शाळा

योग्य प्रयत्न, सुयोग्य मार्गदर्शन आणि सुसंधी जर उपलब्ध झाली तर प्रत्येक व्यक्ती समाजाचा महत्त्वाचा उत्पादक घटक बनू शकते, असा प्रिझम कुटुंबियांचा विश्वास आहे. माधवी ओगले व्यावसायिक शाळा १८ ते ३० वर्षे या वयोगटातील मुलांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी कटीबद्ध आहे. त्यासाठी स्क्रिन प्रिंटिंग, पेपर तयार करणे, कॅनिंग, फाईल्स बनविणे, बेकिंग, वर्तमानपत्राच्या पेपर बॅग्ज बनविणे, कागदी वस्तू बनविणे अशासारखे उपक्रम राबविले जातात. यातून मुलांचा आत्मविश्वास वाढतोच त्याचबरोबर इतर कौशल्येही वाढतात.

या प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष कृती करणे, उत्पादन करणे, त्याची विक्री करणे यांचा समावेश असतो. पदार्थांची किंमत ठरविणे, त्याचे पॅकिंग करणे, बाजार शोधणे, हेही मुलांना शिकविले जाते. वेगवेगळ्या संस्थांना भेटी देणे, त्यांच्याकडून आपल्या मालासाठी ऑर्डर मिळविणे, सामान पोहोचविणे, वेगवेगळ्या प्रदर्शनात भाग घेणे यासारख्या गोष्टीतून त्यांचे संवादकौशल्ये वाढते, जोडीला आत्मविश्वासही वाढतो.

मधमाश्या जशा सतत कार्यरत असतात, आपल्याच उद्योगामध्ये रममाण असतात, स्वत:बरोबरच इतरांनाही त्यांचा उपयोग होतो, तसा या मुलांनाही समाजाचा उपयुक्त घटक म्हणून सतत कार्यरत राहता यावे, समान संधी व अधिकार मिळावा हे माधवी ओगले व्यावसायिक शाळेचे ध्येय आहे.

Prism Foundation

We Shall Overcome



## BENNU TRAINING INSTITUTE

Bennu aims at creating awareness and understanding of "special education" in mainstream schools and the society at large. Visits, workshops, presentations are the various modes used to create awareness amongst teachers, principals and decision makers from various schools in order to help them identify any child who may be suffering from some kind of learning disability.

The institute guides and supervises trainees from various teacher-training institutes in and around Pune. Experts and renowned professionals from different fields are invited to facilitate training programs for teachers from Prism as well as other mainstream and special educational institutes.

The Bennu Training Institute interacts with parents with an aim to help them accept and understand the child's difficulties and inculcate a positive attitude towards the child. We coordinate child guidance and counseling along with the concerned principal, parents, class teacher and clinical psychologist.

Our focus is on the appropriate approaches to learning, different behavioral patterns of the children and supportive activities.

'आस ज्ञानसूर्याची'
Bennu Training Institute

## बेन्यू प्रशिक्षण संस्था

बेन्यू प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून समाजामध्ये विशेष शिक्षणाबद्दलची जागरुकता व समज निर्माण केली जाते. क्षेत्रभेटी, कार्यशाळा, सादरीकरण यांच्याद्वारे शिक्षक, मुख्याध्यापक, निर्णयक्षम अधिकारी यांच्यापर्यंत पोहचून अध्ययन अक्षमता असलेल्या, संमिश्र अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांबाबत जागृती निर्माण केली जाते.

त्याचबरोबर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातील सहभागींना, इतर शाळांतील शिक्षकांना व प्रिझममधील शिक्षकांना विशेष शिक्षणासंबंधित विषयांवर प्रशिक्षण देऊन अद्ययावत ज्ञानाने समृद्ध करण्यासाठी बेन्यू मार्गदर्शन करते.

मुलांच्या अडचणी पालकांनी समजून घ्याव्यात, त्यांच्याकडे सकारात्मकतेने पहावे, त्यांचा स्वीकार करावा यासाठी बेन्यू मार्फत पालकांशी संपर्क साधला जातो, समुपदेशन केले जाते. यासाठी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनही उपलब्ध केले जाते.

बेन्यू प्रशिक्षण संस्थेतर्फे पुणे व पुण्याच्या आसपासच्या परिसरातील गावांपर्यंत पोहचून समाजातील शक्य तितक्या लोकांना विशेष शिक्षणाबद्दल जागरुक करणे, प्रशिक्षित करणे व विशेष विद्यार्थ्यांचे जीवन शक्य तितके सुलभ व्हावे यासाठी प्रयत्नरत राहणे, हे बेन्यूचे ध्येय आहे.





Prism Foundation

We Shall Overcome

## **SRUJANRANG** Center For Creative Expressions

Srujanrang was established in June 2009 by Prism in order to expose children to various art forms and to provide the special children of all three schools of Prism with an outlet for their creative expression.

Developing an interest in rhythm and music and starting to appreciate it, being able to express one's inner - most feelings on a canvas through art, handling a lump of clay and giving it shape, listening to stories and poems, acting in dramas, dancing to lively beats - all these experiences lead to happiness and enjoyment, reduce stress and tension, provide scope for self expression and reduce aggression.

Along with these experiences, an important objective of Srujanrang is to increase the attention span of the child, inculcate social skills, help in the recognition of emotions, improve eye-hand coordination and fine motor skills.

A child's intelligence is not limited only to academics. It is of the utmost importance to recognize and develop the multiple intelligences which each child is endowed with.

All the activities conducted in Srujanrang are planned, keeping scientific approach in mind, developed through research.

Appreciation of beauty and creative self - expression is the aim which Srujanrang has kept in mind and is moving forward with new activities every year in order to achieve this goal





SRUJANARANG



## **सृजनरंग** कला अभिव्यक्ती केंद्र

जून २००९ मध्ये 'सृजनरंग कला अभिव्यक्ती केंद्र'ची सुरुवात झाली आणि फिनिक्स, लार्क, माधवी ओगले व्यावसायिक शाळांमधील विद्यार्थ्यांकडे जणू 'आनंदाचे झाड' रुजले. या सगळ्या विशेष विद्यार्थ्यांसाठी मुक्तविष्काराची संधी मिळाली.

ताल, लय, संगीत याची जाण निर्माण होणे, रुजणे, मनातल्या इच्छा, भावना चित्रफलकावर उमटवणे, मातीशी नाळ जोडून मातीने हात बरबटून घेऊन निर्मिती करणे, गंमतगाण्यांचा, कवितांचा, गोष्टींचा आस्वाद घेत, शरीराच्या मुक्त हालचाली करत लयीवर थिरकणे, नाट्याद्वारे व्यक्त होणे, असे छोटे-छोटे आनंद घेत, ताण दूर करत, संवेदनशीलता जपणे हा सृजनरंग कला अभिव्यक्ती केंद्राचा हेतू आहे.

याचबरोबर अवधानकक्षा वाढविणे, वर्तनात अपेक्षित बदल घडविणे, कारक, भावनिक, सामाजिक कौशल्य विकासासाठी या कलामाध्यमांचा उपचार पद्धती म्हणून वापर करणे हा सृजनरंगाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

सृजनरंग मध्ये होणारे सर्व उपक्रम हे नियोजित, संशोधनपूर्वक विकास व शास्त्रीय दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून आखले जातात

मुलांमधील बुद्धिमत्ता ही फक्त पढीक, पारंपरिक अभ्यासाशी निगडीत नसून त्यांच्या बहुविध बुद्धिमत्तांचा विकास घडविणे, मनाला सुंदराचा वेध घेता येणे, ही ध्येये मनाशी जपत सृजनरंगची वाटचाल सुरू आहे.



**Prism Foundation**

We Shall Overcome

Since 1990

**Special Education**

77, Erandavane, Prabhat Road, Lane No. 15. Pune - 411004. Maharashtra, India.
Tel.: +91 20 2567 9714, 2567 7335, 2567 5964
Email: prismfoundation@hotmail.com • www.prism-foundation.in